पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८
पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय
संत तुकारामनगर, पिंपरी-१८

जाहिरात क्र. ५३ /२०२२

**दरमहा एकत्रीत विद्यावेतन/मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात विविध डॉक्टरांची पदे भरणेबाबत..**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये वैद्यकिय अधिकारी(सी.एम.ओ./ शिफ्ट ड्युटी(आय.सी.यू./पोस्टमार्टेम सेंटर)/बी.टी.ओ) यांच्या मानधनावरील व कनिष्ठ निवासी यांच्या विद्यावेतनावरील नेमणुका फक्त ६ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या,तसेच वरिष्ठ निवासी यांच्या विद्यावेतनावरील नेमणुका ३६४ दिवसांसाठी तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या भरणेबाबत प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पुर्तता करणा-या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्जामध्ये चुकीची अथवा खोटी माहिती सादर करणा-या उमेदवारांना निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविणेत येईल. पदनाम, पदसंख्या, एकत्रित मानधन व आरक्षण खालीलप्रमाणे...

**वरिष्ठ निवासी एकूण मंजुर पदे -५९ .**

| अ. क्र | विभाग निहाय पदाचे नाव | एकूण पदे | अनु. जाती | अनु. जमाती | वि जा अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमा प्र | इमाव | आ.दु. घ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १००% | १३% | ७% | ३% | २.५ % | ३.५ % | २% | २% | १९% | १०% | ३८% |
| १ | मेडीसीन | ०५ | ०१ | - | | | ०१ | | - | ०१ | ०१ | ०१ |
| २ | गायनॅक | ०५ | ०१ | - | | | ०१ | | | ०१ | ०१ | ०१ |
| ३ | सर्जरी | ०३ | ०१ | - | | | - | | - | ०१ | - | ०१ |
| ४ | ऑर्थोरोग | ०३ | ०१ | - | | | - | | - | ०१ | - | ०१ |
| ५ | रेडिओलॉजी | ०३ | ०१ | - | | | - | | - | ०१ | - | ०१ |
| ६ | कम्युनिटी(मेडी | ०३ | ०१ | - | | | - | | - | ०१ | - | ०१ |
| ७ | भुलशास्त्र | १० | ०१ | ०१ | | | ०१ | | - | ०२ | ०१ | ०४ |
| ८ | बालरोग | ०४ | ०१ | - | | | - | | - | ०१ | ०१ | ०१ |
| ९ | इमर्जन्सी वॉर्ड | ०३ | ०१ | - | | | - | | - | ०१ | - | ०१ |
| १० | आय.सी.यु | ०८ | ०१ | ०१ | | | ०१ | | - | ०१ | ०१ | ०३ |
| ११ | रुग्णालय प्रशासन | ०२ | ०१ | - | - | | | | - | - | ०० | ०१ |
| १२ | सूक्ष्मजीवशास्त्र | ०२ | ०१ | - | - | | | | - | - | ०० | ०१ |
| १३ | विकृतीशास्त्र | ०२ | ०१ | - | - | | | | - | - | ०० | ०१ |
| ११ | मानसोपचार | ०१ | आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ३(१)(घ) तरतुदीनुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही. | | | | | | | | | ०१ |
| १२ | कान,नाक घसा | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| १३ | त्वचा रोग | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| १४ | उरोरोग | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| १५ | नेत्ररोग | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| १६ | डायलेसिस | ०१ | | | | | | | | | | ०१ |
| १७ | एकूण- | ५९ | १३ | ०२ | | | ०४ | | - | ११ | ०५ | ०१<br>२४ |

Scanned by TapScanner

कनिष्ठ निवासी एकूण मंजुर पदे -५८,

| अ. क्र | विभाग निहाय पदाचे नाव | एकूण पदे | अनु. जाती | अनु. जमाती | विजा अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमा प्र | इमाव | आदुघ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १००% | १३% | ७% | ३% | २.५ % | ३.५ % | २% | २% | १९% | १०% | ३८% |
| १ | मेडीसीन | १६ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | ०३ | ०१ | ०५ |
| २ | गायनॅक | ०७ | ०१ | - | ०१ | | | | - | ०१ | ०१ | ०३ |
| ३ | सर्जरी | ०३ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | - | ०१ |
| ४ | दंतरोग | ०३ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | - | ०१ |
| ५ | डायलेसिस | ०२ | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | ०१ |
| ६ | बालरोग ICU | ०३ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | - | ०१ |
| ७ | इमर्जन्सी वॉर्ड | ०४ | ०१ | - | - | - | - | - | - | ०१ | ०१ | ०१ |
| ८ | आय.सी.यु | १६ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | - | - | - | ०३ | ०२ | ०६ |
| ९ | उरोरोग | ०२ | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| १० | त्वचारोग | ०२ | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| ११ | नेत्ररोग | ०२ | ०१ | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | एकूण- | ५८ | १३ | ०२ | ०५ | | | | - | ११ | ०५ | २२ |

वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ एकूण मंजुर पदे-५ ,वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी एकूण मंजुर पदे-५ व वैद्यकिय अधिकारी बी.टी.ओ एकूण पदे-०२

| अ.क्र | विभाग निहाय पदाचे नाव | एकूण पदे | अनु. जाती | अनु. जमाती | विजाअ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | आ.दु.घ | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १००% | १३% | ७% | ३% | २.५ % | ३.५% | २% | २% | १९% | १०% | ३८% |
| १ | सी.एम.ओ | ०५ | ०१ | - | ०१ | | | | - | ०१ | ०१ | ०१ |
| २ | वैद्यकिय अधि. शिफ्टड्युटी(आय.सी.यु./पोस्टमार्टेम सेंटर) | ०५ | ०१ | - | ०१ | | | | - | ०१ | ०१ | ०१ |
| ३ | ब्लड बँक बी.टी.ओ | ०२ | ०१ | - | - | | | | - | - | - | १ |
| | एकूण | १२ | ०३ | - | ०२ | | | | - | ०२ | ०२ | ०३ |

*शैक्षणिक अर्हता व अनुभवानुसार द्यावयाचे दरमहा मानधन*

| *अ.क्र.* | *पदनाम* | *शैक्षणिक अर्हता* | *एम.बी.बी.एस /बी.डी.एस* | *संबधीत विषयाचा डिप्लोमा* | *संबधीत विषयांची पदवी* |
|---|---|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ निवासी | मान्यता प्राप्त विद्यापिठाकडील MBBS पदवी उत्तीर्ण. +संबंधित विषयातील डिग्री/MD/MS/ DNB मान्यताप्राप्त डिप्लोमा तसेच एम.एम.सी. रजि.अद्ययावत असणे आवश्यक. | ७२,२५०/- | - | - |
| २ | कनिष्ठ निवासी | मान्यता प्राप्त विद्यापिठाकडील MBBS पदवी उत्तीर्ण तसेच एम.एम.सी. रजि.अद्ययावत असणे आवश्यक. | ६४५५१/- | - | - |
| ३ | कनिष्ठ निवासी | बी.डी.एम.असणे आवश्यक एम.एम.सी. रजि.अद्ययावत असणे आवश्यक. | ६४५५१/- | - | - |

Scanned by TapScanner

**वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ/शिफ्ट ड्युटी/बी.टी.ओ.**

| अ.क्र | विभागनिहाय पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | दरमहा मानधन रक्कम |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ. | मान्यता प्राप्त विद्यापिठाकडील MBBS पदवी उत्तीर्ण. एम.एम. सी रजि. अद्ययावत असणे आवश्यक. | ७५०००/- |
| २ | वैद्यकिय अधिकारी शिफ्टड्युटी(आय.सी.यू. /पोस्टमार्टेम सेंटर) | मान्यता प्राप्त विद्यापिठाकडील MBBS पदवी उत्तीर्ण एम.एम. सी रजि. अद्ययावत असणे आवश्यक. | ७५०००/- |
| ३ | ब्लड बँक वैद्यकिय अधिकारी (बी.टी.ओ) | मान्यता प्राप्त विद्यापीठाची MBBS/DCP उत्तीर्ण व FDA approved, MD path प्राधान्य. एम.एम. सी रजि. अद्ययावत असणे आवश्यक. | एमबीबीएस-७५०००/-<br>पदविका-८००००/- |

अटी शर्ती-

१) निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती वाय.सी.एम.रुग्णालयामधील कोणत्याही विभागामध्ये सोईच्या दृष्टीने करणेत येईल.

२) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची मुदत दि. ०१/०६/२०२२ ते दि. ०५/०६/२०२२ पर्यंत www.pcmcindia.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

३) वाय.सी.एम.एच.वर क्लिक करुन ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याकरिता "Create New User"/आपले खाते तयार करा" यामध्ये नांव,व तदअनुषंगिक माहिती, वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे.तसेच तदनंतर उमेदवाराने स्कॅन केलेले छायाचित्र व स्वत:ची स्वाक्षरीची ईमेज (५००KB पेक्षा मोठे नसलेले) अपलोड केल्यानंतर नोंदणीकृत भ्रमणध्वनीवर OTP प्राप्त होईल. OTP टाकल्यानंतर Save केल्या नंतर आपले (New User ID) खाते तयार होईल. User ID-Password टाकुन ऑनलाईन फॉर्म भरावा. यामध्ये पदनाम, जात-प्रवर्ग,पत्ता, शैक्षणीक अर्हता,अनुभव याची माहिती भरावी.व Save करावे. Print Preview वर क्लिक करुन भरलेली संपूर्ण माहिती बरोबर आहे का याची खात्री करावी. माहिती चुकीची वाटल्यास दुरुस्ती (Edit) करता येईल. खात्री झाल्यानंतर Final Submit करावे. तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत वैध असणे आवश्यक आहे.

४) ज्या उमेदवारांना एकापेक्षा जास्त पदांसाठी अर्ज करावयाचे असतील अशा उमेदवारांनी एका संवर्गात अज पूर्णपणे भरुन पुन्हा नव्याने रजिस्ट्रेशन करावयाचे आहे. नव्याने रजिस्ट्रेशन करताना ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वापरावा.सदर User ID-Password जतन करणे आवश्यक आहे.

५) उमेदवाराने अलीकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो अपलोड करावा.फोटोमध्ये टोपी,गॉगल,मास्कने चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी. छायाचित्राची ईमेज ५००KB पेक्षा मोठी नसावी.

६) उमेदवारांनी विहीत नमुन्यातील ऑनलाईन अर्ज भरण्यापुर्वी www.pcmcindia.gov.in संकेतस्थळावर जाउन सविस्तर जाहिरात अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरावा. विहीत नमुन्यातील ऑनलाईन अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

७) निवडयादी व प्रतिक्षायादी अलाहिदा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील.यासाठी उमेदवाराने महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत(UPDATES) पाहणे आवश्यक आहे.

८) वैद्यकिय अधिकारी(सी.एम.ओ./ शिफ्ट ड्युटी(आय.सी.यू./पोस्टमार्टेम सेंटर)/बी.टी.ओ) यांच्या मानधनावरील व कनिष्ठ निवासी यांच्या विद्यावेतनावरील नेमणुका फक्त ६ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या आहेत.तसेच वरिष्ठ निवासी यांच्या विद्यावेतनावरील नेमणूका ३६४ दिवसांसाठी तात्पुरत्या हंगामी स्वरूपाच्या आहेत.

९) करार पध्दतीने नियुक्ती फक्त सहा महिने कालावधीसाठी देण्यात आल्यामुळे संबंधीतांस महानगरपालिकेच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशणा बाबत किंवा सामावून घेण्याबाबत व नियमित सेवेचा इतर कोणताही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल. तसेच ६ महिने नेमणूक कालावधी पुर्ण झाल्यानंतर पुनश्च नेमणूक मिळणार नाही. या सर्व बाबीचे अर्जदाराने विहित नमुन्यात हमीपत्र देण्यात यावे.

१०)ज्या दिवशी म.न.पास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय त्यांची मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येईल.

११) कागदपत्रे तपासणीस व मुलाखतीस येण्या-जाण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा भत्ता दिला जाणार नाही.

१२) अर्जासोबत सादर केलेला अनुभवाचा दाखला खोटा असल्याचे निदर्शनास आल्यास तो अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही. संपुष्टात आणण्यात येईल.

१३) सर्व उमेदवारांनी कागदपत्रे तपासणीसाठी उपस्थीत राहताना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र, एम.एम.सी रजि. व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या मुळ प्रती व सांक्षाकित केलेल्या सत्य प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशिट) प्रमाणपत्र, फोटो, अनुभव प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहेत.

Scanned by TapScanner

१४) निवड केलेल्या उमेदवारांना मनपाने ठरवून दिलेल्या अटी व शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील. रूग्णालयीन/कोरोना संबधी कामकाज करणेस नकार दिलेस नेमणूक तात्काळ रद्द करणेत येईल.

१५)सदर पदांना महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागु राहील.

१६) वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी यांना २४ तास रूग्णालयात राहून काम करावे लागेल. ज्या युनिटमध्ये किंवा वॉर्डामध्ये नेमणूक होईल त्यांचे अधिपत्याखाली काम करावे लागेल.

१७) यापुर्वी मागील सहा महिने कालावधीत यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयात काम केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करू नये. त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१८)उमेदवारांनी कार्यालयीन/ रूग्णालयीन कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील. त्यामध्ये कोणतीही सवलत अनुज्ञेय नाही.

१९)उमेदवारांची नेमणूक झालेनंतर बायोमेट्रीक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील. व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय विद्यावेतन/मानधन अदा केले जाणार नाही.

२०) नियुक्ती प्राधिकारी म्हणून मा.आयुक्त यांना विशेष परिस्थीतीत कोणत्याही वेळी सदरील सेवा समाप्त करण्याचा अधिकारी राहील.

२१) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराचे नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

२२) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही आजार उद्भवल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही.

२३) करार पध्दतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून आठ दिवसाच्या आत रूजू होणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

२४)करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी. तसेच त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्री बाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

२५) निवड झालेल्या उमेदवारांस एकत्रित विद्यावेतन/मानधनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही सोयी सुविधा, हक्क व इतर आर्थिक लाभ देय राहणार नाही.

२६) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना/दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्याची उमेदवारी/निवड रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाल्यानंतरही कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

२७)अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२८) मनपा/ रूग्णालयीन सेवेत असताना उमेदवारांच्या चुकीमुळे मनपाचे/ रूग्णालयाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करून घेणेत येईल.

२९) वय, शैक्षणिक अर्हता, मागासवर्ग, अनुभव, अंतिम परिक्षा वर्षातील गुण इत्यादी अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधीत रकान्यात स्पष्टपणे नमुद केले नसल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

३०)कागदपत्रांचे तपासणीचे वेळी शैक्षणिक अर्हता धारण न करणे/अपुर्ण कागदपत्रे सादर करणारे उमेदवारास निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

३१) अर्जदारांनी आपल्या वैयक्तीक माहितीत त्यांचा अचुक ई-मेल, पत्ता व मोबाईल क्रमांक देणे बंधनकारक आहे.

३२) उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी निवेदने,निवड व प्रतिक्षायादी व इतर सुचना ह्या वेळोवळी मनपाचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही.त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सुचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सुचना पाहिल्या नाहीत या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तसेच याबाबत उमेदवारांने समक्ष यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय चाणक्य कार्यालयामध्ये येवून विचारणा करू नये.

३३) अर्ज करणा-या उमेदारांनी दि. ०७/०८/२०२५ पर्यंत ज्या पदासाठी अर्ज सादर केला आहे. त्या पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, एम.एम.सी रजि. व इतर सर्व अर्हताधारण करणे/अटीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३४) ऑनलाईन अर्ज करणा-या उमेदवारांनी एका पदासाठी एकच अर्ज करावा. इतर पदांसाठी ऑनलाईन अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदासाठी स्वतंत्र ऑनलाईन अर्ज सादर करावा. एकाच ऑनलाईन अर्जावर इतर पदांचा उल्लेख करून नये असे अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

३५)उमेदारांना वयाची अट लागू राहणार नाही.

Scanned by TapScanner

तरी इच्छुक उमेदवारांनी वरील पदांकरिता दिनांक- ०१/०६/२०२२ते दि. ०८/०६/२०२२ अखेर मनपाचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा.पोस्टाने आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. मुदतीनंतर आलेल्या उमेदवारांच्या ऑनलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही. रजिस्ट्रेशन झालेल्या उमेदवारांना सदर पदासाठी घेतल्या जाणा-या लेखीपरिक्षा/मौखीक मुलाखतीबाबत मनपाचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर सुचना दिल्या जातील व त्याबाबतचा तपशील मनपाचे वेबसाईटवर प्रसिध्द केला जाईल. सदर कालावधीत आवश्यक तेवढे उमेदवार न मिळाल्यास वरील पदे भरेपर्यंत दर सोमवारी Walk In Interview आयोजित केल्या जातील. यासाठी समक्ष पत्रव्यवहार केला जाणार नाही.

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.

जाहीरात क्र. /२०२२
रोटेशन क्र.-
वेबसाईट –www.pcmcindia.gov.in
क्र.वायसीएमएच/७/कावि/१५२/२०२२
दिनांक- ३०/०५/२०२२.

Scanned by TapScanner